Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# जैन स्त्री संघ पद्धती

**डॉ. एस. वाय. गवळी,** उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल ता. साक्री जि. धुळे.
**प्रा. वाय. ए. गांगुर्डे,** कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कळवण (मानूर) ता. कळवण जि. नाशिक.

**प्रस्तावना**

प्राचीन कालखंडापासून भारतीय संस्कृतीचा व तिच्या उदयाचा अभ्यास करता प्रामुख्याने यामध्ये दोन विचार प्रवाह दिसून येतात एक प्रवृत्तीमार्गे आणि दुसरा निवृत्तीमार्गे वैदिक कालखंडाचा विचार केल्यास लौकिक जीवनावर विश्वास ठेवणाऱ्यांना प्रवृत्तीमार्गे असे म्हटले जाते तसेच त्याग, तप या विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्यांना निवृत्तीमार्गे असे म्हटले जाते. आणि हीच निवृत्तीमार्गे विचारधारा पुढे जाऊन श्रमण परंपरा म्हणून उदयाला आली व विकसित झाले.

**गृहीतके**

1. जैन साध्वी स्त्रियांची संघ पद्धती रचना लोकशाहीवर आधारित आहे.
2. जैन साध्वी स्त्रिया या आकर्षक जीवनशैली पासून मुक्त आहे.
3. साध्वी या जैन तत्त्वज्ञानानुसार आपल्या उदरनिर्वाहासाठी लागणारे अन्न जमा करतात.
4. जैन साध्वी या दिनचर्येमध्ये आपल्या गुरुच्या आदेशाचे पालन करतात.

**उद्दिष्टे**

1. जैन साध्वी स्त्रियांची भिक्षणी होण्याची कारणे समजून घेणे.
2. जैन साध्वींची दिनचर्या पद्धती समजून घेणे.
3. जैन साध्वी स्त्रियांची भिक्षासंबंधी नियम व भिक्षा गवसने समजून घेणे.
4. जैन संघ पद्धतीमध्ये लोकशाही कशा स्वरूपात कार्यकर्ते व पद कोणती आहे हे समजून घेणे.

**भिक्षुणी होण्याची करणे**

जैन धर्म एक स्वतंत्र रूपाने खऱ्या अर्थाने नावारूपाला आला तो भगवान महावीरांपासून त्याआधी त्याची २४ तीर्थंकर यांची परंपरा आपल्याला दिसून येते. या परंपरेतच पुढे जाऊन ज्याप्रमाणे भिक्षू संघ आहे त्याचप्रमाणे भिक्षुणी संघ देखील समकाळात उदयाला आलेले दिसून येतात.[१] स्त्री भिक्षुणी संघ उदयाला येण्यासाठी फक्त आध्यात्मिकच कारण कारणीभूत नव्हते तर त्या व्यतिरिक्त अनेक कारणांची चर्चा 'स्थानांग आणि टीका ग्रंथामध्ये' करण्यात आली आहे.[२]

स्वताच्या इच्छाने झालेली भिक्षुणी, आवेश मध्ये येऊन झालेली भिक्षुणी, अत्यंत दरिद्री अवस्थेमुळे जीवन जगणे मुश्किल झाल्यामुळे झालेली भिक्षुणी, स्वप्न पडल्यामुळे झालेली भिक्षुणी, प्रतिज्ञा घेऊन झालेली भिक्षुणी, स्मरण करून झालेली भिक्षुणी तीर्थंकर मल्ली समान, आपल्या शरीराला असणाऱ्या व्याधीमुळे झालेली समाज आदर देत नाही त्या अनादारामुळे झालेली भिक्षुणी, देवता (गुरु) यांच्या उपदेशामुळे झालेली भिक्षुणी, पुत्र स्नेहा मुळे झालेली भिक्षुणी पुत्राने संन्यास घेतल्यामुळे स्वतः भिक्षुणी होणे.[३]

वरील प्रमुख १० कारणे भिक्षुणी होण्यासाठी आपल्याला दिसून येतात. या व्यतिरिक्त अनेक कारणे असे आहे की, ज्या कारणांमुळे समाज व्यवस्थेला कंटाळून अनेक स्त्रिया यांनी भिक्षुणी धर्म स्वीकारून संघात राहणे पसंत केले. ज्याप्रमाणे विविध कारणांमुळे स्त्रिया भिक्षुणी म्हणून जैन धर्मात प्रवेश घेत असल्या तरी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

संघातील काही वैशिष्ट्य होते. त्यात जात, धर्म, रंग, वर्ण, लिंग इ. याचा भेदभाव न पाळता सर्वांना प्रवेश दिला जात होता. परंतु संघाची प्रतिष्ठा व सुरक्षितता या दृष्टीचा विचार करता काही चुकीच्या व्यक्तींचा संघात प्रवेश होऊ नये. यासाठी काही नियम घालून देण्यात आले होते ते पुढील प्रमाणे व आशा स्त्री-पुरुषांना संघात प्रवेश नाकारला जात असे. बालक ज्याचे वय आठ वर्षापेक्षा कमी आहे, वृद्ध व्यक्ती, नपुंसक, अतिमूर्ख, रोगी, चोर, डाकू, राजाचा अपमान करणारा, आंधळा, दास, दृष्ट, मूर्ख, ऋणी, बंधक, नौकर, अपराधी, गर्भिन, छोटे छोट्या मुलांची आई, इत्यादी स्त्रियांना व पुरुषांना संघात प्रवेश नाकारलेले उदाहरणे आपल्याला दिसून येतात. ज्या स्त्रियांनी गर्भधारणा केली आहे. त्या स्त्रियांना संघात प्रवेश नव्हता. असा नियम असला तरी आपल्याला अनेक अशी उदाहरणे दिसून येतात की गर्भ असताना देखील स्त्रियांनी संघात प्रवेश करून दीक्षा घेतली यामध्ये 'मदन रेखा' ही गर्भवती असताना तिने दीक्षा घेतली.[४]

**संघात भिक्षणींची दिनचर्या**

उत्तराध्यायनामध्ये जैन भिक्षू यांच्या दिनचर्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे भिक्षुणी यांच्या दिनचर्याविषयी देखील नियम घालून देण्यात आले आहे. दिवस व रात्र यांचे चार-चार भागात विभाजन करण्यात आले व प्रत्येक भागासाठी योग्य काम निश्चित करण्यात आले. त्यानुसार जीवन निर्वाह करावे असे निर्देश देण्यात आले. या चार भागांमधील पहिला भाग हा स्वाध्यायासाठी, दुसरा भाग हा ध्यान करण्यासाठी, तिसरा भाग हा भिक्षा गवसण्यासाठी व भोजन करण्यासाठी तसेच चौथा भाग हा पुन्हा स्वाध्याय करण्यासाठी. रात्रीच्या चार भागांचे देखील समप्रमाणात विभाजन करण्यात आले असून त्यातील पहिला भाग हा स्वाध्याय, दुसरा भाग ध्यान, तिसरा भाग शयन व चौथा भाग पुन्हा स्वाध्याय करावा असे नियम घालून दिले आहे.[५] तरी भिक्षणींना असे निर्देश देण्यात आले होते की, त्यांनी सूर्योदय झाल्यानंतर पहिल्या भागामध्ये सर्वप्रथम आपले भांडे, पात्र प्रतिलेखन करून गुरूला वंदना करावी व गुरूला विचारावे आता मला काय करणे आवश्यक आहे. यावरती गुरुंनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे जर आपल्याला कुठलीही कार्य दिले गेले नाही. तर आपण स्वाध्याय करावा.या ठरवून दिलेल्या दिनचर्या व्यतिरिक्त त्यांना सहा आवश्यक कृत्य करणे अभिप्रेत होते. त्यात सामायिक, सांत्वन, वंदन, प्रतिक्रमण, कार्यश्रम आणि प्रत्याखान हे करणे आवश्यक होते.[६]

यानुसार प्रत्येक जैन भिक्षुणीचे हे दिनचर्येचे प्रमुख कृत्य होते.

१. **सामायिक :-** आपल्या चित्तामध्ये समताभाव आणणे म्हणजे सामायिक होय. अर्थात लाभ-हानी, वियोग-संयोग, सुख-दुःख, तहान-भूक इत्यादी प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील राग व द्वेष रहित जीवन जगणे म्हणजे सामायिक होय.

२. **स्तवन :-**२४ तीर्थंकर यांचे श्रद्धापूर्वक स्तुती करणे म्हणजेच स्तवन होय.

३. **वंदन :-** त्याचप्रमाणे मन, वचन व शरीर हे शुद्ध ठेवून आचार्य गुरु इत्यादी ना विधिपूर्वक नमन करणे म्हणजे वंदन होय.

४. **प्रतिक्रमण :-** दैनंदिन क्रियांमध्ये आपल्या हातून काही प्रमाद दोष होतात ते दोष निवृत्त करण्यासाठी प्रतिक्रमण आवश्यक आहे.

५. **कायोत्सर्ग :-** कायोत्सर्ग जैन भिक्षुणीच्या दिनचर्येचा एक आवश्यक भाग आहे. कायोत्सर्गामुळे सगळी दुःखातून मुक्त होता येतात. कायोत्सर्ग याचे मुख्य ध्येय शरीर स्थिर करून एकाग्रचित्ताने आपले दोष जे आहे त्याकडे लक्ष केंद्रित करून ते दूर करणे अर्थात देहाप्रती असणारे ममत्व भाव याचा त्याग करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

६. **प्रत्याख्यान :-** संसारिक विषयांचा त्याग म्हणजे प्रत्याख्यान असे म्हटले जाते. त्याबरोबरच आहारामधील विशिष्ट पदार्थांचा विशिष्ट काळासाठी त्याग केला जात असे. यातून असा विश्वास व्यक्त केला जातो की, यामुळे माणसाची संयम वृत्ती वाढते.

प्रतिलेखन वस्त्र आणि पात्र इत्यादी उपकरणं संबंधी सम्यक प्रकारे वापर करणे म्हणजे प्रतिलेखन होय. वरील वस्तूंचा वापर करीत असताना कुठल्याही स्थितीमध्ये जीव जंतू यांची हिंसा होणार नाही याची काळजी घेणे म्हणजे प्रतिलेखन होय.[७]

**आलोचना**

प्रत्येक भिक्षू व भिक्षुणी यांना दिवसातून दिनचर्या करत असताना काही दोष निर्माण होतात हे सर्व दोष आपल्या गुरुसमक्ष कबूल करून गुरुदेव ते प्रायचित्त सांगतील ते स्वीकारणे यास आलोचना असे म्हणत.[८]

**भिक्षा संबंधी नियम**

जैन भिक्षणींची भिक्षा मागण्याची तुलना भ्रमरा बरोबर केली आहे. भ्रमर ज्याप्रमाणे फुलांना कुठलाही त्रास न देता फुलांमधून रसग्रहण करतो. त्याप्रमाणे भिक्षणींनी गृहस्थांना कुठल्याही स्वरूपाचा त्रास न पोहोचवता त्यांच्यापासून आपल्याला आवश्यक असणारे अन्न मिळवावे.[९] भिक्षुणींनी स्वादिष्ट जीवन मिळेल या आमिषाने कुठल्याही संपन्न घरी जाणे टाळावे. याशिवाय त्यांना सवलत देण्यात आली होती की, ते प्रत्येक घरातून थोडे-थोडे भोजन जमा करू शकतात. पाऊस चालू असताना किंवा प्रचंड वादळ सुरू असताना तसेच जीवजंतू इकडे तिकडे फिरत असताना भिक्षा मागण्यासंबंधी भिक्षुणी यांना निषेध करण्यात आला आहे.[१०] ज्या स्वामी कडे उपाश्रय म्हणून राहत असेल त्या ठिकाणाहून भिक्षुणी यांनी भिक्षा ग्रहण करण्यास निषेध करण्यात आला आहे. दीक्षा वृत्ती साठी भिक्षुणी यांनी एकटे जाऊ नये. दोन किंवा तीन भिक्षुणी यांनी एकत्र येऊन भिक्षावृत्तीसाठी जावे. मन प्रसन्न चित्तशांत ठेवून भिक्षा मिळवण्यासाठी जावे. भिक्षा मागण्यासाठी भिक्षुणी यांनी आपण राहत असणाऱ्या उपाश्रय पासून चार हात भूमी पर्यंत जावे. त्यामुळे असा विश्वास केला जात असे की, त्यांचे मन हे चंचल होणार नाही व त्यामुळे सूक्ष्म प्राण्यांची हिंसा होणार नाही. भिक्षणी झाडीझुडपी असणाऱ्या रस्त्याने भिक्षा गवसण्यासाठी जाण्याचा निषेध करण्यात आला होता. तसेच दलदलीयुक्त रस्त्याने जाण्यापासून शक्यतो टाळावे जर दुसरा पर्यायी मार्गच नसेल तर त्या ठिकाणाहून अगदी सावधानीपूर्वक जावे त्याचे कारण अशा मार्गाने भिक्षुणी पाय घसरून पडण्याची संभावना जास्त असते. भिक्षुणी यांना राख, भुसे, शेणाचे ढिगार यांच्या वरून जाण्याचा देखील निषेध करण्यात आला आहे. त्याबरोबरच भिक्षुणी ने अति जोरात चालू नये किंवा रस्त्याने हसणे व बोलणे यासाठी सुद्धा वर्जित करण्यात आले होते. याचे कारण आपल्या इंद्रियांवर संयम ठेवणे हे होते. ज्या रस्त्याने राजा, कोतवाल, राजाचे अधिकारी किंवा इतर राजघराणेतील व्यक्ती यांचे घर असतील अशा रस्त्याने भिक्षुणी यांनी जाण्याचा निषेध करण्यात आला आहे. कारण सुंदर भिक्षुणी यांना पाहून ती आपल्या अंतपुरात असावी अशी भावना कोणाची निर्माण होऊ नये हे होते. उदाहरणादाखल आचार्य कालक याची बहीण भिक्षुणी सरस्वती ही राजा गर्दभिल्ल हा तिच्यावर आसक्त झाल्याची कथा सर्व परिचित आहे. भिक्षा मिळविण्यासाठी भिक्षुणी यांना उच्च-नीच सगळया घरात जाण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु वेश्या व मोहल्ले अशा ठिकाणी भिक्षा मागण्यास निषेध करण्यात आला होता.[११]

**संघात भिक्षुणीचे पद**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

प्राचीन अगम ग्रंथांमध्ये भिक्षुणी संघ संघटनात्मक पद्धतीमध्ये पद विभाजन कशा स्वरूपात होते. याविषयी स्पष्ट उल्लेख मिळत नाही. परंतु संघ पद्धती सक्षमपणे चालवली जात होती. याचा अर्थ त्याच्यामध्ये निर्धारित पद व कर्तव्य होती. ज्ञाताधर्मकथा ग्रंथांमध्ये भिक्षुणी, निग्रंथी असे शब्दप्रयोग येतात. सर्वात पहिले छंद सूत्र या ग्रंथात जैन भिक्षुणी संघटनात्मक व्यवस्था याचे काही सूचक प्रमाण मिळतात. या ग्रंथात भिक्षुणी, निग्रंथी, आर्या, प्रवर्तिने गणावच्छेइणी या शब्दांचा प्रयोग झालेला आहे. आणि नंतरच्या ग्रंथात यांच्या कार्याविषयी सुद्धा आपल्याला माहिती मिळते बृहतकल्पभाष्य या ग्रंथात भिक्षुणी यांचे पाच पदांचा उल्लेख आपल्याला दिसून येतो. त्यातील प्रवर्तिनी, अभिषेका, भिक्षुणी, स्थविरा आणि क्षुल्लिका[१२]

१. **प्रवर्तिनी:-** प्रवर्तिनीला साध्वीची नायिका म्हटले जात.
२. **अभिषेका :-** ही प्रवर्तिनी पदास योग्य मानली जात असे. मुख्य प्रवर्तिनीच्या मृत्यू झाल्यानंतर त्या पदावर ती कार्य करत असे. ती भावी गनिणी देखील असे.
३. **भिक्षुणी:-** साध्वी शब्दाचा अर्थ भिक्षुणी आहे. उत्तर भारतातील अभिलेखांमध्ये तिला भिक्षुणी 'शिशीनी' असे शब्दप्रयोग आहे. जैन व बौद्ध दोन्हीही धर्मांमध्ये साध्वी यांना भिक्षुणी असे म्हटले आहे.
४. **स्थविरा:-** या पदावरील अधिकारीनी ही वृद्ध व खूप वर्षांपूर्वी दीक्षा घेतलेली भिक्षुणी असे संघटन व्यवस्थेमध्ये तिचे स्थान हे भिक्षुणींच्या आधी येत असून स्थविरा यांना अधिकार व कर्तव्य याविषयी स्पष्ट सूचना मिळत नाही.
५. **क्षुल्लिका:-** ही साधी प्रव्रजीत स्त्री होती. तिला संघाच्या आचार, विचार व नियमांची पूर्ण माहिती नसे. दक्षिण भारतातील अभिलेखात जैन भिक्षुणी यांनी समाधीमरण आणि दान देण्याच्या अनेक घटनांचा उल्लेख आहे. तेथे गुड्डी हा शब्द प्रयोग केला असे.

**समारोप**

जैन संघ पद्धतीचा अभ्यास करत असताना एक प्रमुख गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे भिक्षु-भिक्षुणी श्रावक आणि श्राविका या चार घटक संघातील महत्त्वाचे होते. पण त्यातील महत्त्वाचा स्तंभ भिक्षु-भिक्षुणी हे होते. प्राचीन साहित्यामध्ये त्यांच्याविषयी अनेक नियम व उपनियम तयार करण्यात आले. प्रामुख्याने भिक्षु-भिक्षुणी हे परस्पर संबंध व सहवासातून स्वाभाविक त्यांच्यामधील संबंध वाढत जाऊन चारित्रपतन होण्याची शक्यता होती. या गोष्टीचा विचार करून संघटन पद्धतीमध्ये सुरुवातीलाच सविस्तर अशा नियमांची रचना करण्यात आली आहे. जैन संघ पद्धतीमध्ये प्रवेश घेत असताना जात, धर्म, लिंग, रूप, वर्ण अशा कुठल्याच गोष्टीचा विचार केला जात नाही. आणि सर्वांना संघ पद्धतीमध्ये प्रवेश दिला जात असे. परंतु स्त्री मुक्ती ही मान्य केलेले दिसून येत नाही. (दिगंबर पंथात) असे असले तरी श्वेतांबर पंथाच्या विचारधारेमध्ये स्त्रीला सुद्धा मुक्तीचा मार्ग खुला आहे असे दिसून येते. उदाहरणार्थ मल्लिकार्जुन भिक्षुणी असून देखील तीर्थंकर पदापर्यंत पोहचली. तसेचत्यांना सोबत भ्रमण व उपाश्रय यात राहण्यास परवानगी नव्हती. भिक्षा जमा करताना सुद्धा त्यांनी घालून दिलेल्या नियमांचा वापर करावा एकंदरीत एक उदार व सर्व समावेशक विचारधारा जैन संघ पद्धतीमध्ये स्त्री विषयक असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

१. डॉ. अरुण प्रताप सिंह, जैन भिक्षुणी – संघ एक अनुशीलन, कला एवं धर्म शोध संस्थान, वाराणशी पृ. १२
२. स्थानांग, ३/१५७


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

३. स्थानांग, ३/२०२
४. उत्तराध्ययन निर्युक्ती पृ. १३६-१४०
५. उत्तराध्यायन, २६/१२
६. योगासारप्रभृत , ५/४६
७. उत्तराध्यायन, २६/२३-२४
८. ओघनिर्युक्ती, पृ.२५
९. दशवैकालिक, १/२-४
१०. डॉ. अरुण प्रताप सिंह, जैन भिक्षुणी – संघ एक अनुशीलन, कला एवं धर्म शोध संस्थान, वाराणशी पृ. २५
११. डॉ. अरुण प्रताप सिंह, जैन भिक्षुणी – संघ एक अनुशीलन, कला एवं धर्म शोध संस्थान, वाराणशी पृ. २४-२५
१२. बृहत्कल्पभाष्य, भाग तृतीय, २४०७-टीका. ("संयत्य: क्षुल्लिका स्थाविरा भिक्षुणी अभिषेका प्रवर्तिनी चेति पच्त्रविधा")


Copyright © | JET Network, All Rights Reserved